महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. दुरूस्ती-०११९/प्र.क्र.**७३**/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २९ मे २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांच्या कार्यालयाच्या मुख्य इमारतीत लिफ्ट बसविण्यासाठी आवश्यक ते विद्युतविषयक काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ लिफ्ट-बांध.-विद्युतीकरण/ पुणे-शहर/ ३५१/ २०१८, दिनांक २०.०२.२०१९.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांच्या कार्यालयाच्या मुख्य इमारतीत लिफ्ट बसविण्यासाठी आवश्यक ते विद्युतविषयक काम करण्याकरिता रु.२७,०९,८४०/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उप अभियंता, विद्युत (सा.बां.) उप विभाग क्र.१, पुणे, यांनी सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते (१) कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत (सा.बां.) विभाग, पुणे, आणि (२) अपर पोलीस आयुक्त (प्रशासन), पुणे शहर, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते रु.२७,९६,०००/- असे सुधारित केले आहेत व त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस आयुक्त, पुणे शहर, यांच्या कार्यालयाच्या मुख्य इमारतीत लिफ्ट बसविण्यासाठी आवश्यक ते विद्युतविषयक काम करण्याकरिता रु.२७,९६,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाजास, निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये या अटीवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस १०९, जिल्हा पोलीस (००) (००)(०१), जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८), (दत्तमत) (अनिवार्य), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन, सार्वजनिक बांधकाम विभाग *(अनौपचारिक संदर्भ क्र.१४८/२०१९/इमा.-२, दिनांक २८.०३.२०१९)* आणि वित्त विभाग *(अनौपचारिक संदर्भ क्र.१३०/२०१९/व्यय-७, दिनांक २२.०४.२०१९)* यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२९१५३७०८६९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL
GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad0118
4493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND
FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b9
5322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL
BORSE
Date: 2019.05.29 15:39:47 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, पुणे शहर.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत (सा.बां.) विभाग, पुणे *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Abstract Sheet" च्या प्रतीसह).*
२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (व्यय-७/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).